
एलन जे आणि भूमिगत रेलरोड

मार्लिन टार्ग ब्रिल

चित्र: जेनिस ली पोर्टर



मराठी: अश्विनी बर्वे

एलन जे आणि भूमिगत रेलरोड

मार्लिन टार्ग ब्रिल

चित्र: जेनिस ली पोर्टर

मराठी: अश्विनी बर्वे



लेखकाची नोंद

एलेन जे आणि त्याचे कुटुंब 1840 च्या दशकात रँडॉल्फ, ओहायो येथे राहत होते. जय कुटुंब सोसायटी ऑफ फ्रेंड्स किंवा क्वेकर्स नावाच्या धार्मिक गटाशी संबंधित होते. मित्रांचा सर्व लोकांच्या समानतेवर विश्वास होता. त्यामुळेच ते सर्वजण साधे आणि सारखे कपडे घालायचे आणि अनोळखी असो वा मित्र सर्वांना 'सर' म्हणून संबोधत. दुर्दैवाने, दक्षिण युनायटेड स्टेट्समध्ये राहणा - या बहुतेक आफ्रिकन अमेरिकन लोकांना समान वागणूक दिली गेली नाही. ते लोक गुलाम होते. ते दिवसभर पगाराशिवाय काम करायचे. मालक गुलामांना प्राण्यांप्रमाणे वागवत. जेव्हा जेव्हा गुलाम पळून जायचे तेव्हा त्यांना पकडून शिक्षा केली जात असे. त्यांचा अनेकदा छळ करण्यात आला किंवा त्यांना मारण्यात आले. ज्या लोकांनी गुलामांना पळून जाण्यास मदत केली त्यांनाही शिक्षा झाली. ॲलनचे पालक, आयझॅक आणि रोडा जे यांनी गुलामांना पळून जाण्यास मदत केली, जरी हे काम अत्यंत धोकादायक होते. जे अंडरग्राउंड रेलरोड नावाच्या गुप्त गटाचा सदस्य होता.

भूमिगत रेल्वेमार्गावर काम करणारे लोक फरारी गुलामांना त्यांच्या कोठारे, पोटमाळा आणि गुप्त खोल्यांमध्ये लपवून ठेवत. ते पळून गेलेल्यांना एका सुरक्षित ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जात असत. फरारी लोक अखेरीस पायी, वॅगन किंवा घोड्यावरून गुप्त मार्गांनी कॅनडामध्ये पोहचत तिथे कायद्यानुसार सर्वांना समान वागणूक दिली जात होती. जे ने काय केले ते इतरांना सांगितले नाही - अगदी त्याच्या स्वतःच्या मुलांनाही नाही. अकरा वर्षांच्या ॲलनला माहित होते की त्याच्या पालकांनी अनाकलनीयपणे दिसणार्या काळ्या अनोळखी लोकांना खायला दिले आणि लपवले. पण त्याला गुलामगिरीबद्दल फारशी माहिती नव्हती - जोपर्यंत त्याचा सामना पळून गेलेल्या गुलामाशी झाला नाही.

.



१ जुलै १८४२

ॲलनने शेवटचा शर्ट दोरीवर लटकवला. त्याची आई खूप आजारी होती आणि ती भारी काम करू शकत नव्हती. त्यामुळे हे काम त्यांच्या ज्येष्ठ मुलावर सोपवण्यात आले. दर सोमवारी ॲलन कपडे धुत असे, त्यांना उकळत असे, स्टार्च करत असे आणि त्यांना सुकविण्यासाठी बाहेर टांगत असे. त्यानंतर तो खेळायला मोकळा होत असे.

आज दुपार

ॲलन फिशिंग रॉड उचलण्यासाठी गोठ्याच्या दिशेने निघाला होता. समोरचे अंगण ओलांडत असताना, त्याला रस्त्यात एक घोडा दिसला, तो जे च्या शेताकडे धावत येत होता. काही सेकंदात फॅमिली डॉक्टर समोरच्या गेटवर येऊन थांबले.

"दोस्त जे! दोस्त जे!"

डॉक्टर ओरडले.


ॲलनचे वडील गोठ्यातून बाहेर आले. आणि वेगाने गेटकडे जाऊ लागले.

“आजू तुझ्या घोड्याने काय पंख लावले आहेत का?” जे म्हणाला.

“तू खूप घाईत आहे असे दिसते.”



डॉक्टर, इसहाकच्या बाजूला वाकला आणि म्हणाले “एक पळालेला गुलाम जंगलात लपला आहे,” डॉक्टर हळू आवाजात म्हणाले.



“गुलामाचा मालक आणि त्याची माणसे मागे मागे येत आहेत, आणि त्यांच्याकडे बंदुका आहेत, "डॉक्टरांनी इशारा दिला.

डॉक्टरांनी इसाहकचा खांदा धरलाआणि म्हणाला, "सावध राहा मित्रा.“ ॲलनच्या वडिलांनी होकार दिला.

डॉक्टर घोडा फिरवून निघून गेला.

ॲलन त्याच्या वडिलांच्या जवळ गेला त्याने त्यांचा त्रासलेला चेहरा पाहिला.

ॲलनने विचार केला: गुलामाचा धनी येईल का? वडिलांना गोळ्या घालणार?

त्याला इतर क्वेकर्सच्या कथाही आठवल्याज्यांनी पळून गेलेल्यांना मदत केली होती.

काही क्वेकर्सना मारहाण करण्यात आली.

इतरांची घरे जाळली.



आयझॅक जेने आपल्या मुलाकडे पाहिले. "ॲलन," त्याचे वडील म्हणाले, "तुला लवकरच काळा रंगाचा माणूस दिसेल. त्याला घेऊन मोठ्या अक्रोड झाडाच्या मागून मक्याच्या शेतात घेऊन ये. तेथे मका चांगला वाढला आहे, तेथे सहजपणे लपवले जाऊ शकते. पण जर तू हे केले तर, मग तू मला किंवा कोणालाच त्याच्याबद्दल अजिबात सांगू नकोस." मग आयझॅक जे वळले आणि गोठ्यात परत गेला.

ॲलनला समजत नव्हते की आता त्याने काय करायला पाहिजे?

तेवढ्यात जंगलातून एक आवाज आला, त्यामुळे ॲलनच्या विचारात व्यत्यय आला.

त्याने बघितले की झाडांच्या मागून कोणीतरी पुढे येत आहे.

ॲलन चुपचाप आवाजाच्या दिशेने गेला आणि पायरव बंद झाला.



अचानक बंदूक घेतलेला एक माणूस बाहेर झाडांमधून आला.

ॲलन मागे सरकला.

दोघेही एक दुसऱ्याकडे बघू लागले.

काही न बोलता. त्या माणसाचे कपडे फाटलेले होते आणि पायातून रक्त येत होते.

त्याची काळी पाठ चिरलेली होती.

आणि त्यावर चाबकाचे वळ होते.


“तू मास्तर जे चा मुलगा आहे का?” त्या माणसाने विचारले.

त्याचे डोळे सतत इकडेतिकडे बघत होते.

“हो,” ॲलनने म्हटले.

“मी ॲलन आहे, त्यांचा मुलगा.”

मग त्या माणसाने आपली बंदुक बाजूला केली.





ॲलनने बोलण्यासाठी हिंमत गोळा केली. त्याला नेहमी शब्द स्पष्ट बोलण्यास त्रास होत असे. त्या माणसाला त्याचे बोलणे कळणे महत्वाचे होते. “माझ्या मागे ये,” ॲलनने हळूवार आवाजात म्हटले.

“वडिलांनी तुम्हाला लपण्याच्या जागेवर नेण्यासाठी सांगितले आहे.”

“मला समजले,” माणूस म्हणाला.



ॲलनने त्याला जंगलाच्या कोपऱ्यात असलेल्या शेताच्या मागे नेले.

ते मक्याच्या शेतातून पळतांना वाकले.

ॲलनने त्याला आक्रोदाच्या झाडाच्या खालून एका मोकळ्या जागी नेले.

“तू इथे गुपचूप रहा आणि सगळयांच्या नजरेपासून दूर राहशील.” ॲलनने कुजबुजत म्हटले.

“माझ्यावर दया कर,” त्या माणसाने विनंती केली.

“माझे नाव हेन्री जेम्स आहे. मी परवा पळालो होतो, आणि तेव्हापासून मी काहीच खाल्ले पिल्लेले नाही.”

त्याचे डोळे उदास आणि थकलेले दिसत होते.

त्याचे ओठ उन्हामुळे फुटले होते.



“मी लवकरच काही खायला घेऊन येतो.”

ॲलनने त्याला म्हटले.

मुलाने सुरक्षिततेच्या दृष्टीने सगळीकडे बघितले.

कोणी माणसाने हेन्री जेम्सला बघायला नको याची काळजी घेतली.

मक्याचे एक झाड तोडले आणि झाडू सारखे आपल्यामागे लावले.

म्हणजे त्याच्या पायाचे निशाण मिटून जातील.

मग ॲलन जंगलाच्या मार्गाने घराकडे धावत गेला.

त्याला आशा होती की त्या गुलामाचा मालक काही तास तरी दूर राहिल.

कारण त्याच्या वडिलांना त्या गुलामाला सुरक्षित ठिकाणी पोहचवण्यासाठी योजना तयार करावी लागेल.

त्यासाठी वेळ लागेल.

गोठ्याजवळ जाताच ॲलन सावकाश चालू लागला.

त्याला वाटले की कोणीतरी त्याला बघत आहे.

ॲलनने स्वयंपाक घराचा दरवाजा उघडला.

मिल्टन, वाल्टर, अबिजा आणि मैरी टेबलावर मटार सोलत होते.

त्याची आई तिच्या खुर्चीतून उठली.

“बस ॲलन,” तिने शांतपणे आवाज दिला.

“माझे तुझ्याकडे काही काम आहे.”

“पण आई,“ ॲलनने विरोध करत म्हटले.

“चुप बस, बाळा," आई म्हणाली.


ॲलन, वाल्टरच्या जवळ बसला.

“मेरी, मक्याची भाकरी आणि बेकन एका टोपलीत ठेव,” रोडा जे म्हणाली.

ॲलनला आश्चर्य वाटले की त्याच्या आईला दिवसाच्या या वेळेला स्वयंपाक करायला कोणी सांगितले असेल. आणि त्याचे सर्व भाऊ-बहीण आत का आहेत?

“मक्याची भाकरी कोण खाईल?” छोट्या मिल्टनने विचारले.

“जो कोणी वाटसरू या रस्त्याने जाईल तो,” आईने हसून उत्तर दिले.





रोडा जे ने भरलेली टोपली अलनच्या हातात दिली.

“ही टोपली अशा माणसाला दे ज्याला भूक लागलेली आहे,” ती म्हणाली.

ॲलनने टोपली घेतली.

आणि बरोबर दूधाचा जग घेतला.

मग तो परत लवकरच शेतात परत गेला.

जेव्हा तो आक्रोडाच्या झाडाजवळ पोहचला.

ॲलनने फांदी तुटल्याचा आवाज ऐकला. तेव्हा मक्याच्या शेतातून काळ्या बंदुकीची नळी पुढे आली. ॲलन दचकला.

क्लिक!

त्याला माहीत होते की बंदूक फायर करायला तयार होती.



"कृपया, गोळी चालवू नका," त्याने विनंती केली.

हेन्रीने बंदुक बाजूला केली आणि मक्याचे झाड बाजूला केले.

“तू मला घाबरवलं,” हेन्रीने म्हटले.

त्याचा आवाज कापत होता.

ॲलनने दीर्घ श्वास घेतला आणि मग तो जवळ गेला.

“हे खाऊन घे,“ ॲलनने म्हटले.


त्याने जे आणले होते ते त्याने त्या माणसाला दाखवले. हेन्रीने जग घेतला आणि मग त्याने मोठा घोट घेतला.

“हे खूप छान आहे, मास्टर ॲलन,”

हेनरी जेम्सने आभार मानत म्हटले,

“तू इथे तोपर्यंत आराम करू शकतो जोपर्यंत माझे बाबा तुला घ्यायला येत नाही.

अच्छा, आता मी निघतो,” ॲलनने म्हटले.



ॲलन मक्यामधून शेताच्या काठावर गेला.


शेतात पोहोचल्यावर त्याला काही आवाज ऐकू आले.

कोणी पाहण्याआधी जळाऊ लाकडाच्या ढिगाऱ्यामागे तो लपला.

ॲलनने जंगलात डोकावून पाहिले तर सहा जण घोड्यावर वडिलांसमोर उभे होते.

त्यांच्याकडे बंदुका होत्या.





एका माणसाने वडिलांना कठोरपणे विचारले,

तुला खात्री आहे का? माझा गुलाम पळून जाताना तू पाहिला नाहीस?“

आयझॅक जेने मान हलवली.

"मी तुला एकदा सांगितले होते, की मी कधीच खोटं बोलत नाही.“

गुलाम मालक अविश्वासाने म्हणाला.


"मग तुझं घर शोधावं लागेल?“ तो माणूस ओरडला.

"तुमचे स्वागत आहे,“ आयझॅक जे शांतपणे म्हणाला.

"पण त्यासाठी तुम्हाला योग्य कागदपत्रे लागतील.“

"त्यासाठी नक्कीच थोडा वेळ लागेल,"तो माणूस ओरडला.“

आम्ही सकाळपर्यंत परत येऊ,“ मग तो त्याच्या माणसांना काहीतरी म्हणाला आणि लवकरच ते तिथून निघून गेले.



ॲलनने फरारी गुलाम किंवा त्या संतप्त लोकांबद्दल दुसरे काहीही ऐकले नाही.

आणि काही विचारायची हिम्मतही केली नाही.

आयजॅक जे जेवायलाआत आल्यावर तो काहीच बोलला नाही.

त्या रात्री ॲलनच्या आईने लहान मुलांना लवकर झोपायला पाठवले.

ॲलनचे वडील गोठ्यात गेले.

थोड्या वेळाने ते दारात आले आणि त्यानी ॲलनला बाहेर बोलावलं.

म्हातारा जॅक, त्यांचा घोडा, बग्गीला बांधून अंगणात उभा होता.

"तुला तुझ्या आजोबांच्या घरी कसे जायला आवडेल?" आयझॅक जेने आपल्या मुलाला विचारले.

"हो, मी तुमच्या बरोबर येऊ शकतो?" ॲलनने आश्चर्याने विचारले.

"नाही, यावेळी तू एकटाच जाणार आहे," त्याचे वडील म्हणाले.

ॲलनने या आधी कधी रात्री जंगलातून प्रवास केला नव्हता.

तिथे अस्वल, जंगली जनावरे आणि साप असतात. आणि कधीतरी गुलाम शिकारी पण असू शकतात. पण ॲलनला समजले, की त्याच्या वडील त्याच्याकडून काय करून घेऊ इच्छितात.



ॲलनची आई बाहेर आली,


तिने आपल्या नवऱ्याची बाही पकडली.

“तुम्ही त्याला पाठवू नका,” आई म्हणाली.

“ते खूप खतरनाक काम आहे.”


“पण मला जायला पाहिजे, आई,” ॲलनने म्हटले.

“जर मालक आणि त्याची माणसे आज रात्री परत आले तर बाबा घरी पाहिजे.”



“मला तुझा अभिमान वाटतो, बेटा,” आयझॅक जे ने म्हटले.

“जर तुला अशी कोणी व्यक्ती माहीत आहे जी तुला साथ देईल. तर उत्तम होईल तू त्या व्यक्तीला बरोबर घेऊन जाऊ शकतो.”





रोडा जे ने आपल्या मुलाला जवळ घेतले.

ॲलन बग्गीमध्ये चढला. आणि त्याने लगाम सांभाळला.

“लवकर जा, आणि मुख्य रस्त्यानेच जा,” त्याच्या वडिलांनी सूचना दिली.


“तू रात्री आजोबांकडे राहू शकतो,”

ॲलन, म्हाताऱ्या जॅकला मक्याच्या शेतात घेऊन गेला. त्याने अक्रोडच्या झाडाजवळ शेताच्या कडेला बग्गी थांबवली.

“मी ॲलन आहे,“ त्याने हळूआवाजात हाक मारली.

“आपल्याला घाई करायला पाहिजे,” हेन्रीने स्वतःला बग्गीमध्ये ओढत नेले.

आणि ॲलनच्या पायाजवळ असलेल्या जागेत त्याने बसून घेतले.



लवकरच त्यांनी फार्महाऊसच्या खिडक्यांमधून चमकणाऱ्या गरम प्रकाशाला मागे टाकले.

एक ढग चंद्रासमोरून गेला.

त्यांच्या खडबडीत रस्त्यावर आजूबाजूला अंधार होता.

ॲलन किंवा हेन्री दोघांनीही एक शब्दही बोलला नाही.

गुलाम शिकारी त्यांना पकडण्याचा प्रयत्न करतील का?


ॲलनने विचार करण्याचा प्रयत्नही केला नाही, कारण तो खूप घाबरला होता.


हेन्रीने त्याला काय मारून जुना जॅक घोडा चोरला तर?

ॲलनने ओल्ड जॅकला सांगितले वेगाने जाण्यासाठी लगाम खेचला.

त्याचे हात ओले दिसत होते.

त्याने खालचा ओठ चावला.





“तुला माझ्यासोबत भीती वाटते का?“ हेन्रीने विचारले.

ॲलन त्याला उत्तर देऊ शकला नाही.

हेन्री म्हणाला, “ही घे, मास्टर ॲलन, तू माझी बंदूक घे.“

"जर कोणी येताना पाहिलं तर, मग ती ताबडतोब मला परत कर.

तू गाडी चालवत राहा. मग मी लगेच बाहेर उडी मारीन.

मला तुमचे कोणतेही नुकसान होऊ द्यायचे नाही.“

हेन्रीने बंदूक ॲलनकडे दिली.


मुलाने मान हलवली. पण त्याने बंदुकीला हात लावला नाही.

हेन्रीने शपथ घेतली, "मी कधीही परत जाणार नाही.“

“ते मिळून मला मारतील; त्यांनी मला शेवटच्या वेळी फटके मारले."

त्यानंतर हेन्रीने ॲलनला गुलाम असल्याच्या गोष्टी सांगितल्या. कैंटकीच्या शेतात हेन्री आयुष्यभर काम केले होते. त्याने आपल्या भावाला सांगितलेत्याला बेदम मारहाण करताना दिसले.


त्याच्या बहिणीलाती दुसऱ्या मालकाला विकली गेली. आता हेन्रीने कॅनडात स्वातंत्र्य मिळवण्याचे ठरवले होते. ॲलनलाही थोडं वाईट वाटलंकारण त्याने हेन्रीवर विश्वास ठेवला नव्हता.





अचानक, ॲलनला पानांमध्ये काहीतरी सळसळ ऐकू आले. त्याचे शरीर थरथरू लागले. गाडीसमोरून एक सावली गेली.

जुना जॅक त्याच्या मागच्या पायावर उभा राहिला. ॲलनने त्याची बोटे दुखायला लागेपर्यंत लगाम खेचला आणि हळूहळू घोडा शांत झाला.




“"काय झालं?" हेन्री कुजबुजला,

"तुला बंदुकीची गरज आहे का?“

“नाही,” ॲलन चिंताग्रस्त हसत म्हणाला.

“रस्ता ओलांडणारा जुना ससा होता.“

पण हेन्री हसला नाही.





ॲलन आणि हेन्री दीड तासाहून अधिक चालले.

ॲलनला प्रत्येक सावलीत गुलामाला मारणारा शिकारी दिसत होता.

त्याला झोप येत होती. त्याच्या पाठीत दुखत होते.

दमट रात्रीमुळे त्याला थंडी जाणवत होती.

आणि तो भीतीने पूर्णपणे थकला होता.

शेवटी, ॲलनला प्रकाश दिसला.

तो आजोबांच्या कॅबिनमधून येत होता.



ॲलनने बग्गीतून उडी मारली त्याने हेन्रीला मदत केली.

ॲलनने दार ठोठावले.

आजोबांनी त्यांच्या नाईटसूटमध्ये त्यांना नमस्कार केला.

आजोबांना नक्कीच आश्चर्य वाटले.

पण काय करायचं ते त्यांना माहीत होतं.

“तुम्ही दोघं पटकन आत जा,” आजोबा जे म्हणाले.


"ॲलन, तू तुझा काका लेवीला उठव."

ॲलनने त्याला सांगितल्याप्रमाणे केले.

काकाने कपडे घातले आणि तो घोड्यांवर काठी घालायला गेला.

आजोबांनी हेन्रीसाठी काही अन्न कपड्यात बांधले.

हेन्रीने आजोबाना धन्यवाद म्हटले आणि तो त्यांच्या मागोमाग गोठ्यात गेला.



हेन्री आणि लेवी निघण्यापूर्वी, ॲलनने हेन्रीकडे हात पुढे केला.

"कॅनडाला सुरक्षित प्रवास करा,“ ॲलन शक्य तितक्या काळजीपूर्वक म्हणाला.

त्याचे शब्द मजबूत आणि स्पष्ट वाटत होते.

हेन्री जेम्सने त्या मुलाचा हात हातात घेतला.

"मला तुझी आठवण येईल, मास्टर जे.“

ॲलनचा हात हलवत तो म्हणाला.

"तू एक धाडसी मुलगा आहेस."



उपसंहार

तीस मिनिटांनंतर, हेन्री आणि लेव्हीने मर्सर काउंटी, ओहायो येथे विनामूल्य आफ्रिकन अमेरिकन लोकांच्या मोठ्या शिबिरात प्रवेश केला. ही वस्ती भूमिगत रेल्वेमार्गावरील महत्त्वाचा थांबा होता. उत्तरेकडे जाणे सुरक्षित होईपर्यंत एका कुटुंबाने हेन्रीला छावणीत लपवून ठेवले. काही महिन्यांतच हेन्री कॅनडाला पोहोचल्याचे जे कुटुंबाला कळले. ॲलन एक प्रसिद्ध क्वेकर पाद्री आणि शिक्षक झाला. तो एक प्रसिद्ध वक्ताही होता आणि त्याने अनेकांना थक्क करून सोडले. ॲलनच्या जन्माच्या वेळी, त्याच्या तोंडाच्या छताला एक छिद्र होते, ज्यामुळे तो काय बोलला हे समजणे कधीकधी कठीण होते. परंतु त्याचे शांती आणि प्रेमाचे शक्तिशाली शब्द अनेक मित्रानी सांभाळून ठेवले होते. मोठे झाल्यानंतर, ॲलनने ॲलन जेच्या आत्मचरित्रात त्याच्या जीवनाची आणि पळून गेलेल्या गुलामासोबतच्या त्याच्या भेटीची कथा लिहिली.

गृहयुद्ध संपेपर्यंत भूमिगत रेल्वेमार्ग कार्यरत राहिला. राज्यांमधील युद्धामुळे अमेरिकेतील गुलामगिरीची प्रथा संपुष्टात आली. तोपर्यंत, 60,000 फरारी गुलामांना रेल्वेमार्गे स्वातंत्र्य मिळाले होते. ही संख्या गुलाम असलेल्या चाळीस लाख लोकांपेक्षा खूपच कमी होती. परंतु भूमिगत रेल्वेमार्गाच्या यशाने ज्यांना गुलामगिरीची इच्छा होती त्यांना मोठा धक्का बसला. युनायटेड स्टेट्सच्या इतिहासातील सर्वात क्रूर प्रथा संपुष्टात आणण्यासाठी तरुण ॲलन जे आणि इतर रेल्वेमार्ग चालकांनी मदत केली.



